**मोटार अपघात दावा अर्ज क्र. ३६/२०२५**

**निशाणी क्र. ४४ खाली**

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. ३ यांची साक्ष**

**मी शपथेवर कथन करतो की –**

माझे नाव – धनंजय शशिकांत मुळे

वय – ३९ वर्षे,

धंदा – नोकरी,

रा. – सेंट थॉमस स्कूलच्या पाठीमागे, डोणगांव रोड, सोलापूर.

**सरतपास अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री. आर.सी. महिंद्रकर यांचेतर्फे सुरु.**

मी आस्था किडनी केअर या दवाखान्यामध्ये मॅनेजर म्हणून कार्यरत आहे. आमच्या दवाखान्याला समन्स प्राप्त झाले आहे. त्याप्रमाणे मला साक्ष देण्यासाठी अधिकारपत्र देण्यात आले आहे. (आता साक्षीदाराला यादी निशाणी क्र.४३/१ वरील अधिकारपत्र दाखवण्यात आले.) त्यावर डॉ. नीलरोहित पैके यांची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे. (सदर दस्त **निशाणी क्र. ४५** वर आहे.)

२. अर्जदार सुशिला बाळू भालेराव हे आमच्या दवाखान्यात दि.२३.०१.२०२५ ते २५.०१.२०२५ या कालावधीत ॲडमिट होते. त्यानंतर दि.१७.०२.२०२५ रोजीदेखील ते आमच्या दवाखान्यात भरती झाले व त्याचदिवशी डिस्चार्ज झाले. त्यांच्या पहिल्या ॲडमिशनचे बिल हे रक्कम रु.३८,२००/– झाले होते. दुसऱ्या भेटीचे बिल रु.८०००/– झाले होते. (आता साक्षीदाराला यादी निशाणी क्र.४३/२ वरील २ बिले दाखविण्यात आली.) त्यावर बिलिंग इनचार्ज बसवराज करे यांची सही असून, ती सही मी ओळखतो. सदर बिलाची रक्कम आम्हाला मिळाली आहे. त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे. (सदर बिलांना एकत्रित **निशाणी क्र. ४६** देण्यात येते.)

**सामनेवाला क्र.१ आणि त्यांच्यातर्फे विधिज्ञ कोणीही हजर नसल्याने, त्यांच्यातर्फे उलटतपास नाही.**

**उलटतपास सामनेवाला क्र. २ तर्फे विधिज्ञ श्री.एम.व्ही. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु**

३. मी, अर्जदार आमच्या दवाखान्यात भरती असल्याबाबत आणि

डिस्चार्ज मिळाल्याबाबत ॲडमिशन आणि डिस्चार्ज कार्ड सोबत आणलेले नाही. हे खरे नाही की, आम्ही अर्जदाराला संबंधित कार्ड दिलेले नाही. मी अर्जदाराला वैयक्तीक ओळखत नाही. हे खरे आहे की, मी डॉक्टर नसल्यामुळे मला अर्जदाराला काय उपचार देण्यात आला हे मला माहित नाही. अर्जदाराला काय उपचार दिला, याबाबतची कागदपत्रे मी आज सोबत आणलेली नाहीत. हे खरे नाही की, मला या बिलाबाबत वैयक्तीक माहिती नाही. हे खरे नाही की, मी हे खोटे सांगतो की, या बिलाची रक्कम आम्हाला मिळालेली नाही. हे खरे आहे की, मी स्वत: या बिलांची रक्कम स्वीकारलेली नाही. या बिलांवर रक्कम कोणी दिली याचा उल्लेख नाही. हे खरे नाही की, अर्जदाराला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

दिनांक – १६/०७/२०२६

PATIL OMSHANKAR SHIVRAJ

Digitally signed by PATIL OMSHANKAR SHIVRAJ
Date: 2026.07.16 17:18:39 +0530

**(ओमशंकर शिवराज पाटील)**

तदर्थ जिल्हा न्यायाधीश – २, सोलापूर.